सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

RNI. NO. MAHBIL /25/A0192

ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

▲ वर्ष २ ▲ अंक : १४ ▲ सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ ▲ पाने : ४ ▲ अमळनेर ▲ किंमत : ३ रुपये

Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,५०,३००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १,३७,७००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १,१५,५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२९०/-
भाव प्रति १० ग्रॅम

श्री मंगळग्रह मंदिरात विधिवत घटस्थापना

आजपासून दररोज श्रीयंत्र व भौमयंत्रावर अर्चन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : आश्विन शुद्ध प्रतिपदा अर्थात मंगळ होरा या शुभ मुहूर्तावर दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी त्रिशुलात्मक भगवान श्री कालभैरव व माता श्री भैरवी यांच्या मंदिरासमोर विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. शिवाय या मुहूर्ताचे औचित्य साधून अतिजागृत भूमिमातेच्या मूर्तीवर सहस्त्र पुष्पार्चन करण्यात आले.

घटस्थापनेचे यजमान शुभम वैष्णव गुरुजी हे सपत्नीक होते. मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी, यश जोशी, तुषार दीक्षित यांनी पौरोहित्य करून विधिवत पूजा केली. चंद्रकांत जोशी यांनी त्यांची ढोलकीवर साथसंगत केली. उमेश पाठक यांनी त्यांना सहकार्य केले. तसेच भूमिमातेच्या मूर्तीवर पुरोहित जयेंद्र वैद्य यांनी सहस्त्र पुष्पार्चन केले.

नवरात्रोत्सवानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात विविध फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आल्याने सर्वत्र चैतन्यमय व भक्तीमय वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

सोमवार, दि. १२ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२६ दरम्यान दररोज होणाऱ्या श्रीयंत्र व भौमयंत्रावर अर्चन यासह विविध धार्मिक कार्यक्रमांवेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

१९ ऑक्टोबर २०२६ रोजी नवचंडी यज्ञ

सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन सत्रांत नवचंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम सत्र सकाळी ९ ते दुपारी १२ व द्वितीय सत्र दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान असेल. या काळात विशेष यजमानांच्या शुभ हस्ते विधिवत नवचंडी यज्ञ होऊन सायंकाळी पूर्णाहुती होईल.



अमळनेर : आश्विन शुद्ध प्रतिपदा अर्थात मंगळ होरा या शुभ मुहूर्तावर दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी त्रिशुलात्मक भगवान श्री कालभैरव व माता श्री भैरवी यांच्या मंदिरासमोर विधिवत पूजाअर्चा करून सपत्नीक घटस्थापना करताना शुभम वैष्णव गुरुजी. (छायाचित्र : मयूर चौधरी)

आजपासून दररोज श्रीयंत्र व भौमयंत्रावर अर्चन

सोमवार, दि. १२ ऑक्टोबर ते रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ दरम्यान दररोज सकाळी १० ते दुपारी १२.३० या वेळेत विशेष यजमानांच्या हस्ते श्रीयंत्र व भौमयंत्रावर अर्चन होईल. तसेच अमळनेर शहरातील महिला मंडळांतील माता-भगिनींच्या शुभे हस्ते सायंकाळी ६.३० वाजता सामूहिक आरती होईल.



अमळनेर : संभाजी भिडे गुरुजी प्रणीत शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संचलित जय बजरंग मंडळ पानखिडकी यांच्यातर्फे गेल्या अठरा वर्षांपासून धर्मजागृतीच्या उद्देशाने 'श्री दुर्गा माता दौड'चे दरवर्षी आयोजन केले जाते. रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी पहाटे पाचला भावसार मढी ते कुंभारटेक अशी पानखिडकीतील इच्छापूर्ती दुर्गा माता मंदिरापासून सुरू झालेल्या दौडमध्ये ध्वजधारी, शस्त्रधारी मायाताई पाटील, अक्षराताई जाधव, ध्वजनिर्माते प्रमोद शिंपी, भालदार-चोपदार लोकेश पाटील, दक्ष पाटील, मशालधारी जितेंद्र पाटील, हरिष शिंपी यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही दौड वाडी चौक मार्गे माळीवाडा, कासार गल्ली, कालिका माता मंदिरातून पुनश्च पानखिडकीत आली. याप्रसंगी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी, आतषबाजी करीत नागरिकांकडून स्वागत करण्यात आले तसेच महाआरती करण्यात आली. याप्रसंगी उपवास चिवडा, केळी व राजगिरा लाडूचे वाटपही झाले. (छायाचित्रे : नितेश बारी)

आजचे अभीष्टचिंतन



श्री. नंदू पाटील
अमळनेर



श्री. राजेश पाटील (रॉकी पवार)
फोटोग्राफर



श्री. आकाश माहेश्वरी
अमळनेर



श्री. अभिषेक पाटील
मंगल सेवेकरी



अमळनेर : आश्विन शुद्ध प्रतिपदा अर्थात मंगळ होरा या शुभ मुहूर्तावर दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी त्रिशुलात्मक भगवान श्री कालभैरव व माता श्री भैरवी यांच्या मंदिरासमोर विधिवत पूजाअर्चा होऊन घटस्थापना झाली. त्यानंतर सायंकाळी महाआरती करताना राजहोळी चौक, पद्मजा व त्रिमूर्ती या बचत गटांच्या अलकाताई सोनार, प्रगतीताई गर्गे, रूपालीताई वाणी, वंदनाताई पाटील, पूजाताई वाणी, सरलाताई शिंपी, अंजनाताई पवार, संगीताताई झाल्टे, आशाताई भील, ज्योतीताई पाटील, बबीताताई पिंगळे. (छायाचित्र : नितेश बारी)

अमळनेर बसस्थानकाच्या विकासकामांचा आज शुभारंभ

आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते होणार भूमिपूजन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहराच्या दळणवळण व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या अमळनेर बसस्थानकाच्या विकासकामांचा शुभारंभ सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी होणार आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते या विकासकामांचे भूमिपूजन होईल.

धुळे ते चोपडा रोडवरील अमळनेर बसस्थानक परिसरात सकाळी ९.३० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अमळनेर बसस्थानक दररोज शेकडो प्रवाशांच्या प्रवासाचे प्रमुख केंद्र आहे. ग्रामीण भागासह शहरातील नागरिकांची या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. त्यामुळे बसस्थानकाच्या विकासकामांमुळे प्रवाशांना अधिक चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बसस्थानकाच्या विकासाच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या भूमिपूजन सोहळ्यास नागरिक व प्रवाशांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. तसेच सर्वांनी वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे नम्र आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होताच शहरातील बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढली आहे. घटस्थापनेचे साहित्य, पूजेचे साहित्य, उपवासाचे पदार्थ आणि संसारोपयोगी वस्तू खरेदीसाठी महिला वर्गाची लगबग सुरू होती.

पारंपरिक नवरात्रोत्सवासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंच्या खरेदीमुळे बाजाराला उत्सवी स्वरूप आले आहे. अमळनेरच्या या पारंपरिक बाजाराची महिला वर्गाला दरवर्षी प्रतीक्षा असते. यंदाही बाजारातील दुकाने विविध वस्तूंनी सजली असून, देवीच्या पूजेसाठी लागणारे घट, अगरबत्ती आणि अन्य साहित्य खरेदीसाठी गर्दी होत आहे. उपवासाचे पदार्थ तसेच घरगुती वापराच्या वस्तूंच्या खरेदीलाही पसंती मिळत आहे. नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी सकाळपासून बाजारपेठेत वर्दळ वाढल्याचे पाहावयास मिळाले.

अमळनेरमध्ये तब्बल आठ दिवसांनंतर पाणीपुरवठा

जय मातादी नगर, पारधी वाडा, ताडेपुरावासी त्रस्त; महिलांचा हंडा मोर्चाचा इशारा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरातील जय मातादी नगर, पारधी वाडा आणि ताडेपुरा परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून पाणीटंचाईची समस्या कायम आहे. त्यामुळे नागरिक कमालीचे त्रस्त आहेत. या भागांत तब्बल आठ दिवसांआड तोही केवळ एक तास आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. यासंदर्भात पालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे या भागांतील संतप्त महिलांनी पाणीपुरवठा सुरळीत व संपूर्ण दाबाने केला जावा, या मागणीसाठी पालिका प्रशासनाला दोन ते तीन दिवसांची मुदत दिली आहे. जर महिलांच्या या मागणीची पालिका प्रशासनाकडून दखल न घेतली गेल्यास मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात हंडा मोर्चा नेण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, यासंदर्भात नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

शहरातील जय मातादी नगर, पारधी वाडा आणि ताडेपुरा परिसरात नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना रात्री इतर ठिकाणांहून पाणी आणावे लागत आहे. काही रहिवाशांना टँकरद्वारे पाणी मागवावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. घरगुती कामांसाठी आवश्यक पाण्याची साठवणूक करताना महिला आणि नागरिकांची मोठी दमछाक होत आहे.

या समस्येबाबत पालिका प्रशासनाकडे तसेच संबंधित व्हॉल्वमनकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्याचे रहिवाशांनी सांगितले. मात्र, अद्याप पाणीपुरवठ्यात कोणतीही सुधारणा झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पाणी मिळत नसल्याची तक्रार व्हॉल्वमन विकी महाजन यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी अरेरावीची भाषा वापरत 'तुम्हाला जे करायचे ते करा,' असे उत्तर दिल्याचा आरोपही स्थानिक रहिवाशांनी केला आहे. याशिवाय स्थानिक नगरसेवकही या समस्येकडे लक्ष देत नसल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधेसाठी अनेक महिन्यांपासून संघर्ष करावा लागत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पाणीपुरवठा नियमित करावा, अशी मागणी होत आहे.



अमळनेर : तब्बल आठ दिवसांनंतर पाणीपुरवठा होतो. तोही पुरेशा प्रमाणात होत नसल्याचे गाऱ्हाणे मांडताना शहरातील जय मातादी नगर, पारधी वाडा आणि ताडेपुरा परिसरातील महिला.

दोन ते तीन दिवसांत प्रश्न सोडवा

परिसरातील पाणीटंचाई दूर करून पुरेशा दाबाने नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी महिलांनी पालिका प्रशासनाला दोन ते तीन दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत प्रश्न न सुटल्यास सर्व महिला मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात हंडा मोर्चा घेऊन धडकतील, असा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, पालिका प्रशासनाने पाणीपुरवठा यंत्रणेची तातडीने तपासणी करून कमी दाबाची कारणे शोधावीत आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आता महिलांच्या इशाऱ्यानंतर तरी प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न परिसरातील रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

॥ नवदुर्गेचे आजचे रूप ॥

ब्रह्मचारिणी

माता ब्रह्मचारिणी म्हणजे तपची चारिणी करणारी देवी. देवीचे हे रूप शांती, प्रेम, तपस्या आणि ज्ञान यांचे प्रतीक मानले जाते.

रंग : पांढरा
फूलमाळ : पांढऱ्या मोगऱ्याची, जाईची किंवा पांढऱ्या शेवंतीची माळ अर्पण करावी.
नैवेद्य : साखर, खडीसाखर, दूध किंवा दुधापासून बनविलेली मिठाई.



संपादकीय

जणू काय खडक थोरला...

'त्याचा काही भरवसा नाही' हे वाक्य नाना पाटेकरबद्दल जेवढ्यांदा वापरले गेले असेल तेवढे ते इतर कुठल्याही कलावंताबद्दल कुणी म्हणायची शक्यताच नाही. रासवट-रांगडेपणा, एखाद्याला असंस्कृत वाटू शकेल इतपत असभ्य होण्याची तयारी, कवितेची एखादी ओळ काळजाला भिडल्यास चारचौघांत अश्रूंना वाट मोकळी करून देण्यास संकोच न बाळगण्याएवढी तरलता आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या पल्याड जाऊन एखादी व्यक्तिरेखा विश्वसनीय करून दाखवण्याचे अगाध सामर्थ्य यांचे मिश्रण म्हणजे नाना. 'त्याचा काही भरवसा नाही' या वाक्यातून अपेक्षित असलेला मनस्ताप आणि त्रास सहन करण्याची सगळ्यांचीच तयारी असे ती त्यामुळेच. पुलंच्या 'म्हैस'ची रंगावृत्ती आली होती, त्यात निवेदक म्हणून काम केलेला पोरसवदा, किरकोळ शरीरयष्टीचा नाना आणि पुढे अनेक व्यक्तिरेखांना आपल्या अंगभूत प्रतिभेचा स्पर्श करून देणारा नाना – या प्रवासात नाना नावाचे तुफान अवघ्या कलासृष्टीला वर-खाली घुसळवून गेले आणि कुणाच्या ध्यानीमनी नसताना अचानक शांतही झाले.

चित्रपटात काम करणे ही अभिनेत्याची स्वतःच्या अविरत शोधाची कथा होऊ शकत नाही; कारण पंधरा-वीस रिटेक झाले तरी फायनल टेकनंतर तो क्षण फ्रीज होऊन जातो; परंतु कलावंत आशयाशी एकरूप झाला असेल आणि नाटकाची तशी ताकद असेल तर रंगभूमीवर ही प्रक्रिया निरंतर सुरू राहू शकते. नानाने विजय तेंडुलकरांच्या 'पाहिजे जातीचे'मधील 'बबन्या' साकारला आणि त्याला प्रचंड दाद मिळू लागली. त्या नाटकाचे सव्वाशे प्रयोग हाउस फुल्ल झाल्यावर नानाने निर्मात्याला पत्र लिहून 'या नाटकात आता मला नवीन काही करता येत नाहीये' असे सांगून ते सोडण्याची परवानगी मागितली होती. याउलट 'पुरुष'चे १८०० प्रयोग झाल्यावरही त्याला प्रत्येक प्रयोगात 'गुलाबराव'मध्ये वेगळे काही गवसे. नानाने स्वतः जाऊन अमोल पालेकरांना गळ घातली नसती तर 'थोडासा रुमानी हो जाये'मधील 'बारीशकर'साठी त्याचा विचारही झाला नसता आणि नानाने त्या भूमिकेस जो काव्यात्म दर्जा मिळवून दिला आहे तोही कदाचित मिळाला नसता. दिग्दर्शक म्हणूनही नानाने 'दिसण्याच्या पलीकडे' जाण्याचे धाडस केले आणि माधुरी दीक्षित, डिंपल यांना 'प्रहार'मध्ये विनामेकअप पडद्यावर आणले.

अरविंद देशपांडे, रमाकांत देशपांडे, सुलभा देशपांडे आणि विजया मेहता यांना तो आपले गुरू मानत असे. या चौघांच्याही कलाजाणिवांचे संस्कार त्याच्यावर झाले. 'अंकुश' ही नानाची व्यावसायिक चित्रपटांकडे वळण्याची सुरुवात. 'अंकुश' पाहून पुलंनी नानाला पत्र लिहिले होते आणि त्यात 'बाजारभावाच्या हिशेबात सुपरस्टार वगैरे नसलेल्या' नानाचे कौतुक केले होते. त्यानंतर नाना 'बाजारातला' सुपरस्टार झाला. चित्रपटाच्या प्रकृतीप्रमाणे स्वतःची शैली बदलण्याची किमया केवळ असाधारण कलावंतच करू शकतो. निर्विकार चेहऱ्याने क्रौर्याची परिसीमा गाठणारा 'परिंदा'मधीला 'अण्णा' आणि 'कलमवाली बाई'ला तिखट प्रश्न विचारणारा 'क्रांतिवीर'मधला 'प्रताप नारायण तिलक' ही अभिनयशैलीची दोन टोके. 'क्रांतिवीर' पाहिल्यानंतर दिलीपकुमार म्हणाले, 'नर्गीस जशी 'मदर इंडिया'चा ठसा पुसू शकली नाही, तसा नाना यापुढे कायम 'क्रांतिवीर' म्हणूनच ओळखला जाईल.' तसे झालेही; पण 'वेलकम'मधला त्याचा विक्षिप्त डॉन उदय शेट्टीही तेवढाच विश्वसनीय वाटला. गद्य संवादाला पद्याची उंची देण्याची क्षमता असलेला, आशाताईंबरोबर पावसात भिजत गाणी ऐकणारा नाना हा त्याचे खरे व्यक्तिमत्त्व आणि जाणीवपूर्वक तयार केलेली प्रतिमा यांच्या मधोमध कुठे तरी होता. 'मैं आझाद हूं' या चित्रपटाचे कौतुक करण्यासाठी नानाने अमिताभ यांना फोन केला होता, तेव्हा ते 'परिंदा'चे कौतुक करू लागले. नानाने त्यांना थांबवून 'यासाठी वेगळा फोन करा' असे सांगितले! हा हिशेबी फटकळपणा नानाने कायम मिरवला. आरती प्रभू हे नानाचे आवडते कवी. चोख व्यावसायिकपणातही 'नाम फाउंडेशन'सारख्या कामातून माणुसकी जपणाऱ्या नानाला 'जणू काय खडक थोरला, त्यातसुद्धा मधाचा झरा गोडगोड' ही आरती प्रभूंची ओळ चपखल लागू होते. असा हा नाना जातानाही 'त्याचा काही भरवसा नाही' या वाक्याला जागूनच गेला. नानाला श्रद्धांजली.

साहस पराक्रम व विनयता प्रदाती... देवी चंद्रघंटा!

शारदीय नवरात्रीचा तिसरा दिवस हा आदिशक्तीचे तिसरे रूप असलेल्या देवी चंद्रघंटा हिच्या पूजेसाठी समर्पित असतो. नवरात्रीच्या तृतीयेला देवी चंद्रघंटेची उपासना करून तिच्या कृपेची प्रामुख्याने याचना केली जाते. देवीचे हे रूप अत्यंत सौम्य, शांत आणि कल्याणकारी मानले जात असले, तरी ती दुष्टांचा संहार करण्यासाठी सदैव सज्ज असते. 'चंद्रघंटा' या नावाचा अर्थ जिच्या मस्तकावर तासाच्या किंवा घंटेच्या आकाराचा अर्धचंद्र शोभून दिसतो अशी देवी, असा होतो. या देवीच्या घंटेच्या आवाजानेच सर्व नकारात्मक शक्ती, भूत-प्रेत आणि असुर पळून जातात, अशी दृढ धार्मिक श्रद्धा आहे.

देवी चंद्रघंटेचे स्वरूप अत्यंत दिव्य आणि अलौकिक आहे. तिचा वर्ण सोन्यासारखा चमचमणारा असून ती सिंहावर आरूढ आहे. देवीला दहा हात आहेत, ज्यांमध्ये ख, बाण, त्रिशूळ, गदा, पद्म (कमळ) आणि धनुष्य यांसारखी शस्त्रे व अस्त्रे तिने धारण केली आहेत. एका हाताने ती भक्तांना अभय देते, तर दुसऱ्या हाताने आशीर्वाद देते. युद्धासाठी सदैव तत्पर असणाऱ्या या देवीच्या चेहऱ्यावर मात्र कमालीची शांतता, सौम्यता आणि करुणा पाहायला मिळते. देवी चंद्रघंटेची



भक्तीभावाने पूजा केल्याने भक्तांमधील भय, चिंता आणि संकटांचा नाश होतो. साधकाला अलौकिक शक्ती आणि आंतरिक शांततेचा अनुभव येतो. या दिवशी पूजेमध्ये देवीला राखाडी किंवा लाल रंगाचे वस्त्र अर्पण करणे शुभ मानले जाते. राखाडी रंग मानवी मनातील वाईट विचार नष्ट करून संयम आणि स्पष्टता दर्शवतो, तर लाल रंग तिच्यातील शौर्य आणि ऊर्जेचे प्रतीक आहे. नैवेद्यामध्ये देवीला दुधापासून बनवलेले पदार्थ किंवा खिरीचा भोग अर्पण करणे अत्यंत प्रिय मानले जाते.

योगशास्त्रानुसार, नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी साधकाचे मन 'मणिपूर चक्रात' प्रवेश करते. देवी चंद्रघंटेच्या उपासनेने हे चक्र जागृत होते, ज्यामुळे व्यक्तीमध्ये अफाट साहस, पराक्रम आणि विनम्रता निर्माण होते. देवीची कृपा लाभल्यास व्यक्तीच्या वाणीमध्ये माधुर्य येते आणि तिच्या भोवती एक सकारात्मक ऊर्जा चक्र तयार होते.

"पिंडजप्रवरारूढा
चण्डकोपास्त्रकैर्युता।
प्रसन्नं तनुते मह्यं चंद्रघंटेति विश्रुता॥"

या मंत्राचा जप करून देवीची आराधना केल्यास जीवनातील सर्व संकटांमधून मुक्ती मिळते असा शाश्वार्थ आहे.

-प्रा. निर्भय धनंजय सोनार,
अमळनेर. मो. : ९०२२०१२४८८

अमळनेरच्या सुपुत्राची जागतिक भरारी

डॉ. विवेक बोरसे सलग दुसऱ्या वर्षी टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : वैज्ञानिक संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे येथील सुपुत्र डॉ. विवेक बोरसे यांनी जागतिक स्तरावर शहराचा नावलौकिक वाढविला आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि एल्सेव्हियर यांच्या संयुक्त विद्यमाने जाहीर करण्यात आलेल्या 'जगातील टॉप २ टक्के शास्त्रज्ञ' यादीत त्यांचा सलग दुसऱ्या वर्षी समावेश झाला आहे. २०२५ आणि २०२६ या दोन्ही वर्षांत त्यांनी हा बहुमान मिळविला आहे. विश्लेषणात्मक रसायनशास्त्रातील त्यांच्या संशोधनाची दखल या जागतिक



यादीच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. डॉ. बोरसे यांची संस्थात्मक संलग्नता हैदराबाद येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च (नायपर) अशी आहे. डॉ. बोरसे यांनी भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मुंबई येथून पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. वैद्यकीय तंत्रज्ञान आणि वैद्यकीय उपकरण निर्मिती क्षेत्रात त्यांनी संशोधन केले आहे. नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करण्यासह प्रयोगशाळेतील संशोधनाचा औद्योगिक क्षेत्रात वापर करण्यासाठी योगदान दिले आहे. जगभरातील शास्त्रज्ञांच्या संशोधनाचा, शोधनिबंधांचा आणि वैज्ञानिक क्षेत्रातील प्रभावाचा विविध निकषांवर अभ्यास करून ही यादी तयार केली जाते. त्यात सलग दोन वर्षे स्थान मिळविणे ही डॉ. बोरसे यांच्या संशोधन कारकीर्दीतील महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जात आहे.

या यशाबद्दल डॉ. बोरसे यांनी संशोधनातील प्रगतीसाठी गुरुजन, सहकारी संशोधक आणि सहकाऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. आगामी काळात आरोग्य क्षेत्रात सामान्य नागरिकांना उपयोगी ठरणारे तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. विवेक बोरसे हे अमळनेर येथील 'बीएसएनएल'चे निवृत्त अधीक्षक भास्कर बोरसे यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या या यशाबद्दल अमळनेर परिसरातून अभिनंदन होत आहे.

बोट दुमडून का जेवू नये?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



भारतीय संस्कृतीत जेवताना पाचही बोटांचा वापर करून घास घेण्याची परंपरा आहे.

पाच बोटांचा पंचमहाभूतांशी संबंध : आयुर्वेदातील मान्यतेनुसार अंगठा, तर्जनी, मध्यमा, अनामिका आणि करंगळी यांचा अग्नी, वायू, आकाश, पृथ्वी आणि जल या घटकांशी संबंध जोडला जातो.

पाचही बोटांनी घास घेण्याची पद्धत : पाचही बोटे एकत्र करून अन्नाला स्पर्श केल्याने पंचमहाभूतांचे संतुलन राखण्यास मदत होते, अशी पारंपरिक धारणा आहे.

अन्नाचा स्पर्श आणि पचनक्रिया : बोटांनी अन्नाचा स्पर्श केल्याने त्याचे तापमान व पोत जाणवते आणि जेवणासाठी मनाची तयारी होण्यास मदत होते.

जेवताना एकाग्रता वाढते : पाचही बोटांनी जेवल्याने अन्नाकडे लक्ष केंद्रित होते आणि 'माइंडफुल ईटिंग'ची सवय लागण्यास मदत होऊ शकते.

अन्नाप्रती आदर व्यक्त करण्याची परंपरा : भारतीय संस्कृतीत अन्नाला 'पूर्णब्रह्म' मानले जाते आणि पाचही बोटांनी घास घेणे अन्नाप्रती कृतज्ञतेशी जोडले जाते.

घास व्यवस्थित घेता येतो : पाचही बोटे एकत्र केल्याने अन्नाचा घास सहज उचलता येतो आणि तो सांडण्याची शक्यताही कमी होते.

सुरेश कांबळे यांना युवा पत्रकार पुरस्कार

पाचोऱ्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अधिवेशनात केला प्रदान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे नुकतेच पाचोरा (जि. जळगाव) येथे शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी उत्तर महाराष्ट्रस्तरीय अधिवेशन-२०२६ उत्साहात झाले. यात पत्रकारितेतील निष्ठावान, समर्पित आणि समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन अमळनेर येथील 'दिव्य खान्देश'चे संपादक सुरेश कांबळे यांना प्रतिष्ठित युवा पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आमदार किशोर पाटील, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा, विभागीय अध्यक्ष डॉ. समाधान मैराळे आणि खानदेश सरचिटणीस डॉ. विजय गाढे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मान्यवरांच्या हस्ते हा गौरवशाली पुरस्कार श्री. कांबळे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.



अमळनेर : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे नुकतेच पाचोरा (जि. जळगाव) येथे शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी उत्तर महाराष्ट्रस्तरीय अधिवेशन झाले. यात पत्रकारितेतील निष्ठावान, समर्पित आणि समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन अमळनेर येथील 'दिव्य खान्देश'चे संपादक सुरेश कांबळे यांना प्रतिष्ठित युवा पत्रकार पुरस्कार प्रदान करताना आमदार किशोर पाटील. शेजारी विभागीय अध्यक्ष डॉ. समाधान मैराळे आदी.

श्री. कांबळे यांनी पत्रकारिता क्षेत्रात दीर्घकाळ दाखविलेली निष्ठा, त्यांची उत्तम कार्यशैली आणि समाजाच्या विकासात व हितात दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कर्तृत्वाची आणि समाजकार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या या यशाबद्दल आणि गौरवशाली कामगिरीबद्दल अमळनेरसह उत्तर महाराष्ट्रातून तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन केले जात असून, पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ येथील स्व. आबासो. अनिल अंबर पाटील माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. संदीप काशीनाथ नेरकर यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली. प्रा. नेरकर यांना पीएच.डी. पदवीचे नोटिफिकेशन प्रदान करताना कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी. शेजारी डॉ. अमित पाटील, प्रा. आकाश चौधरी आणि प्रा. उन्मेष जाधव.

मंगरूळच्या संदीप नेरकर यांना भौतिकशास्त्रात पीएच.डी.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ येथील स्व. आबासो. अनिल अंबर पाटील माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. संदीप काशीनाथ नेरकर यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे.

प्रा. नेरकर यांनी भौतिकशास्त्र विषयात 'स्टडी ऑफ आयोडाईड, आयोडेट, ऑक्झालेट अँड टार्टारेट क्रिस्टल्स ऑफ द लीड ग्रोन बाय जेल मेथड' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. या संशोधनासाठी त्यांना डॉ. अमित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. नुकतेच विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी यांनी त्यांना पीएच.डी. पदवीचे नोटिफिकेशन प्रदान केले. यावेळी डॉ. अमित पाटील, प्रा. आकाश चौधरी आणि प्रा. उन्मेष जाधव उपस्थित होते.


संदीप नेरकर यांचा मंगरूळ येथील स्व. आबासो. अनिल अंबर पाटील माध्यमिक विद्यालयातर्फेही सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमन नीरज अग्रवाल, संचालक मंडळ तसेच प्रताप महाविद्यालयाच्या प्राचार्या, प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

लतादीदींनी लग्न केले नाही, पण एक व्यक्ती अनेक दशके त्यांच्याशी जोडलेली होती; आपुलकीच्या त्या नात्याची गोष्ट

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

लता मंगेशकर यांनी कायम त्यांचे वैयक्तिक आयुष्य प्रसिद्धीपासून दूर ठेवले. पण तुम्हाला माहिती आहे का? एक राजघराण्यातील क्रिकेटपटू लता मंगेशकर यांच्या प्रेमात होता. पण एका कारणामुळे त्यांची लव्ह स्टोरी अपूर्ण राहिली. लता मंगेशकर यांनी त्यांचे वैयक्तिक आयुष्य नेहमीच लोकांच्या नजरेपासून दूर ठेवले. तरीही अनेक दशके एका व्यक्तीचे नाव त्यांच्याशी जोडलेले राहिले. ते म्हणजे राजसिंह डुंगरपूर. राज हे राजस्थानमधील राजघराण्यातील सदस्य, प्रथम श्रेणी क्रिकेटपटू आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष होते. या नात्याबद्दल दोघांनीही कधीच सार्वजनिकरीत्या सविस्तर भाष्य केले नाही. मात्र, डुंगरपूर यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या एका जुन्या मुलाखतीत याबद्दल भाष्य केलेले. लता दीदी आणि राज दोघे वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आले होते. आपल्या कुटुंबांशी अत्यंत एकनिष्ठ होते आणि लग्न न होऊनही त्यांच्यातील मैत्री कायम राहिली.

डुंगरपूर यांनी स्वतः १९५९ मधील त्या भेटीची आठवण सांगितली. राज कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी मुंबईत आले होते. त्यांनी वृत्तवाहिनीला सांगितले, की दिलीप सरदेसाईंचे चुलत भाऊ सोपान सरदेसाई यांना त्यांनी सांगितले होते, की क्रिकेट खेळल्याशिवाय त्यांना राहवत नाही. तेव्हा सरदेसाईंनी त्यांना वाळकेश्वरमधील एका घरी जाण्यास सांगितले, तिथे लता यांचे भाऊ आणि त्यांचे मित्र टेनिसबॉल क्रिकेट खेळत असत. त्या काळात लता मंगेशकर यांच्या गाण्यांचे रेकॉर्डिंग मोठ्या प्रमाणावर सुरू होते आणि डुंगरपूर यांनी सांगितले, की त्यांना लताजींना भेटण्यात विशेष रस



नव्हता. ते क्रिकेट खेळायचे आणि नेपियन सी रोडवरील आपल्या बहिणीच्या घरी परत जायचे. पण जेव्हा त्यांना वर बोलावण्यात आले तेव्हा परिस्थिती बदलली. राज यांनी लताजींचे वर्णन 'अत्यंत सुंदर व्यक्तिमत्त्व' असे केले. लता दीदी, राज यांना सोडायला खाली आल्या होत्या. 'मी त्यांच्या काही रेकॉर्डिंगच्या वेळी आणि इतर कार्यक्रमांना जायचो', असेही राज यांनी सांगितले.

एका वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार डुंगरपूर हे लता दीदींचे खूप चांगले मित्र होते. पण, दोघांनाही त्यांच्या मैत्रीबद्दल सार्वजनिक चर्चा होणे आवडायचे नाही. एका मुलाखतीत लता दीदींना प्रेमाबद्दल आणि त्यांच्या आयुष्यातील भाग्यवान पुरुष कोण होता, याबद्दल विचारण्यात आले. यावर, 'काही गोष्टी केवळ हृदयालाच ठाऊक असाव्यात. त्या तशाच राहू द्या' असे लता दीदी म्हणाल्या.

या मुद्द्यावर अनेक तर्कवितर्क लढविले गेले आहेत. नंतरच्या काळात आलेल्या वृत्तांनुसार डुंगरपूर यांच्या राजघराण्याने या नात्याला विरोध केला होता. एका राजघराण्यातील मुलगीच आपली सून व्हावी, अशी त्यांची इच्छा होती आणि मंगेशकर यांच्या कुटुंबाला लता दीदींसाठी मराठी जोडीदार निवडायचा होता. मुलाखतीत त्यांच्या नात्याबद्दल विचारले असता राज म्हणाले, 'ही अत्यंत खासगी बाब आहे. पण आम्ही वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलो होतो. साठचे दशक खूप वेगळे होते. काही गोष्टी अशा असतात ज्या घडून येत नाहीत. आमच्यात मैत्री आहे आणि आम्ही अजूनही एकमेकांच्या संपर्कात आहोत.'

१९९९ मधील एका मुलाखतीत लता दीदींना त्यांच्या लग्नाबद्दल विचारण्यात आले. त्यावर लता दीदी म्हणाल्या, 'मला त्याबद्दल विचार करायला कधी वेळच मिळाला नाही' लता यांनी वयाच्या तेराव्या वर्षी काम करायला सुरूवात केली होती आणि वडिलांच्या मृत्यूनंतर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी स्वीकारली होती.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



चपरासी से आयपीएस ऑफिसर बनने तक

१२ वीं फेल मनोज शर्मा कैसे बनें कप्तान; बताया अपना सक्सेस मंत्र

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सक्सेस स्टोरी

१२ वीं फेल से लोकप्रिय हुए आयपीएस मनोजकुमार शर्मा को हाल ही में मुंबई में नया ज्वाइंट कमिश्नर ऑफ पुलिस नियुक्त किया गया है। आयपीएस मनोजकुमार शर्मा की कहानी यूपीएससी और असल जिंदगी दोनों में ही काफी प्रेरणादायक है। १२ वीं कक्षा में फेल होने के बाद भी वो कड़ी मेहनत और लगन से २००५ बैच के आयपीएस अधिकारी बने।

मनोजकुमार शर्मा के जीवन पर आधारित फिल्म १२ वीं फेल आने के बाद लोगों को इनके बारे में पता चला कि कैसे उन्होंने कई मुश्किलों का सामना करते हुए यूपीएससी परीक्षा पास की।

बचपन से ही आर्थिक समस्या का किया सामना

आयपीएस मनोजकुमार शर्मा का जन्म ३ जुलाई १९७५ को मध्य प्रदेश के मुरैना जिले के बिलगांव में हुआ था। मनोज एक साधारण परिवार में पले बढ़े जहां आर्थिक स्थिति अच्छी नहीं थी। उनकी शुरुआती जिंदगी मुश्किलों से भरी थी, लेकिन उन्हीं चुनौतियों ने बाद में मनोज कुमार के व्यक्तित्व को निखारा। आयपीएस मनोजकुमार शर्मा का परिवार अक्सर गंभीर आर्थिक समस्याओं से जूझता था।



एसडीएम की डांट ने बनाया सफल आयपीएस अधिकारी

आयपीएस मनोजकुमार शर्मा का स्कूल में रिकॉर्ड अच्छा नहीं था। मनोज ने ९ वीं और १० वीं कक्षा थर्ड डिवीजन में पास की थी। शर्मा की जिंदगी में सबसे बड़ा टर्निंग प्वाइंट साबित हुआ एक एसडीएम की डांट।

१२ वीं कक्षा में एक एसडीएम ने उनको परीक्षा में नकल करने से रोक दिया था और मनोज कुमार हिंदी छोड़कर बाकी सभी विषयों में ईमानदारी से फेल हो गए।

संघर्षों से भरी रही मनोजकुमार की यूपीएससी यात्रा

मनोजकुमार शर्मा बी.ए.पास करने के बाद यूपीएससी की तैयारी के लिए दिल्ली आ गए। दिल्ली में मुखर्जी नगर में उन्होंने रहना शुरू किया। लेकिन यहां भी उनकी आर्थिक स्थिति उनके सपनों के आगे आ गई। अपना गुजारा करने के लिए मनोज कुमार वे टेम्पो चलाना और लाइब्रेरी में चपरासी जैसे छोटे-मोटे काम किए। उनकी यूपीएससी यात्रा संघर्षों से भरी थी। अपने पहले ही प्रयास में मनोज कुमार ने प्रीलिम्स तो पास कर लिया था लेकिन मेन्स में फेल हो गए। इसके बाद दूसरे और तीसरे प्रयास में वो प्रीलिम्स भी पास नहीं कर पाए। फिर भी उन्होंने हार नहीं मानी और लगातार प्रयास जारी रखा।

२००५ में अपने चौथे प्रयास में मनोजकुमार शर्मा ने यूपीएससी में ऑल इंडिया रैंक १२१ हासिल की और आयपीएस के लिए चुने गए। उन्हें महाराष्ट्र कैडर मिला। चयन के बाद मनोज ने सरदार बल्लभभाई पटेल राष्ट्रीय पुलिस अकादमी में अपनी ट्रेनिंग पूरी की और २२ अगस्त २००५ को आयपीएस अधिकारी के रूप में नियुक्त हुए।

यूपीएससी की तैयारी के दौरान मिली जीवनसाथी

मनोजकुमार शर्मा की पत्नी श्रद्धा जोशी एक आयआरएस अधिकारी हैं। मनोज और श्रद्धा की मुलाकात यूपीएससी की तैयारी के दिनों में हुई थी। श्रद्धा ने एक कोचिंग ज्वाइन की थी वहीं पर पहली बार वो मनोज शर्मा से मिली थीं। फिर धीरे-धीरे दोनों के बीच बातें शुरू हुई और यहीं से दोनों का सफर शुरू हो गया।

मुंबई पुलिस में आयजी रैंक पर कार्यरत हैं मनोज

मनोजकुमार शर्मा फिलहाल आयजी रैंक के अधिकारी के रूप में कार्यरत है। हाल ही में आयपीएस अधिकारी मनोज कुमार शर्मा को मुंबई में नया जॉइंट कमिश्नर ऑफ पुलिस (लॉ एंड ऑर्डर) नियुक्त किया गया है। वे पहले महाराष्ट्र के स्टेट लॉ एंड ऑर्डर डिपार्टमेंट में काम कर रहे थे और अब देश की आर्थिक राजधानी में पुलिसिंग और कानून-व्यवस्था की देखरेख कर रहे हैं। आयपीएस मनोजकुमार शर्मा इंडियन पुलिस सर्विस के २००५ बैच के अधिकारी हैं और उन्हें महाराष्ट्र कैडर मिला था। इतने सालों में, शर्मा ने महाराष्ट्र पुलिस में कई अहम पदों पर काम किया है। जिनमें असिस्टेंट सुपरिटेंडेंट ऑफ पुलिस, डिप्टी कमिश्नर ऑफ पुलिस और मुंबई में एडिशनल कमिश्नर ऑफ पुलिस शामिल हैं।

फिल्म १२ वीं फेल के बाद मशहूर हुए मनोज शर्मा

२०२३ में, डायरेक्टर विधु विनोद चोपड़ा ने मनोज शर्मा के दोस्त अनुराग पाठक की किताब पर आधारित फिल्म '१२ वीं फेल' के जरिए मनोज की कहानी को पर्दे पर उतारा। मनोजकुमार शर्मा ने अपनी जिंदगी पर बनी इस फिल्म के लिए कोई पैसे नहीं लिए। उन्होंने एक इंटरव्यू में कहा, 'मैं पूरी तरह ईमानदार हूँ। मैं किसी से पैसे नहीं लेता।' उनके इस बयान ने लोगों के मन में उनके लिए सम्मान और ज्यादा बढ़ा दिया।

सोशल मीडिया पर काफी एक्टिव हैं मनोज शर्मा

आयपीएस मनोजकुमार शर्मा सोशल मीडिया पर काफी एक्टिव रहते हैं। '१२ वीं फेल' फिल्म रिलीज होने के बाद उन्हें काफी लोकप्रियता मिली और उनके फॉलोअर्स भी काफी बढ़ गए।

इंस्टाग्राम पर उनके १.१ मिलियन से ज्यादा फॉलोअर्स हैं। वहीं सोशल साइटपर भी वो काफी एक्टिव रहते हैं और लोगों के साथ अपडेट शेयर करते हैं।

'हारा वही जो लड़ा नहीं'

आयपीएस मनोजकुमार शर्मा की कहानी सिर्फ आयपीएस अफसर बनने की कहानी नहीं है। उनका सफर दिखाता है कि असफलता आपका भविष्य तय नहीं कर सकती है। लाइब्रेरी में चपरासी और टेम्पो चलाने से लेकर सीनीयर पुलिस अधिकारी बनने तक मनोज कुमार शर्मा ने साबित किया कि कुछ असफलताएं या जीवन की कुछ कठिनाइयां आपको हरा नहीं सकती हैं।

मनोजकुमार शर्मा ने साबित किया कि बैकग्राउंड या मार्क्स से ज्यादा जरूरी है लगातार कोशिश करते रहना और खुद पर भरोसा रखना। आज पुलिस महानिरीक्षक (आयजीपी) के तौर पर, वे छोटे शहरों के उन सभी उम्मीदवारों के लिए उम्मीद की किरण हैं जिन्हें अपनी काबिलियत पर शक होता है।



रक्षाबंधन आणि कसाब!

ॲड. उज्ज्वल निकम यांनी सांगितली मटन बिर्याणीमागील खरी स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अभिनेता राजकुमार राव याच्या मुख्य भूमिकेत असलेला 'प्रहार : द अनटोल्ड स्टोरी ऑफ उज्ज्वल निकम' १६ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमात कसाबची भूमिका ललित प्रभाकर याने साकारली आहे. दरम्यान या सिनेमाच्या पार्श्वभूमीवर ॲड. उज्ज्वल निकम यांनी कसाबसोबतचा राखीचा किस्सा शेअर केला आहे.

एका माध्यम समूहाला दिलेल्या मुलाखतीत बोलताना ॲड. उज्ज्वल निकम म्हणाले, की 'मला तो दिवस आजही आठवतो. शनिवार-रविवारच्या ब्रेकनंतर मी परत सोमवारी कामावर आलो तेव्हा माझ्या हातात राखी बांधलेली होती. कसाबने राखीकडे बघत मला विचारले, की 'बादशाह ये क्या हे' तेव्हा मी त्याला म्हटले, की 'तेरा ये सौभाग्य कहा है, तेरी बहन तो पाकिस्तान मै है. अब तू रोयेगा' तेवढ्यात न्यायाधीश तिथे आले आणि त्यांनी विचारले, की काय बोलणे सुरू आहे? तेव्हा मी आमच्या दोघांचे संभाषण त्यांना सांगत होतो. तेवढ्यात कसाबने खाली मान घातली आणि माध्यमांना असे वाटले, की कसाबला बहिणीची आठवण आली आणि तो रडत आहे.

माध्यमांनी इमोशनली ही बातमी खूप रंगवली. मी साडेपाचला कोर्टातून बाहेर निघायचो. तेव्हा बाहेर काय वातावरण आहे? हे मला आधिकारी आधीच सांगायचे. साडेपाच वाजता ऑर्थर रोडजवळ सगळे माध्यम होते. त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना फक्त मी हेच बोललो, की 'कसाबने मटण बिर्याणीची मागणी केली' यावरून परत माध्यमांमध्ये चर्चा रंगली. ही बातमी इतकी पसरली, की दुसऱ्या दिवशी कोर्टात हा मुद्दा उपस्थित झाला. कसाबच्या वकिलांनी न्यायाधीशांसमोर असा प्रश्न केला, की कसाबला बिर्याणी खायची असेल तर तो मला मागेल, तुम्ही तर सरकारी वकील आहात. त्यावर न्यायाधीशांनी मला विचारल्यावर मी 'तुम्ही कसाबला विचारा' असे म्हटले. तेव्हा कसाबने मान खाली घातली. कसाब पंजाबी मुस्लिम होता. त्याला न्यायाधीशांनी हिंदीत विचारले, की 'तुमने मटण बिर्याणी मांगी थी' त्याने खाली मान घातली आणि सगळ्यांना असे समजले, की कसाबने खरोखर बिर्याणी मागितली होती. परंतु त्याने मागितली होती की नाही, हे फक्त मला आणि कसाबला माहिती आहे. तसेच आपल्याकडे असे म्हणतात, की एकदा माणूस ढगात गेला की त्याच्याबद्दल काहीच वाईट बोलायचे नाही.

नवरात्रीत उपवासाचे तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळलात? घरीच बनवा हे ७ झटपट स्नॅक्स

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



नवरात्रीच्या उपवासाला रोज तेच तेच पदार्थ खाण्याची गरज नाही. तुम्ही बटाटा, मखाणा आणि साबूदाणा यांसारख्या नेहमीच्या साहित्यापासून घरीच झटपट, चविष्ट आणि पोटभरीचे उपवासाचे स्नॅक्स सहज बनवू शकता.

घरीच ट्राय करा हे ७ झटपट स्नॅक्स

नवरात्रीच्या काळात अनेक जण उपवास करतात. दिवसभर ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी साधे, पोटभरीचे आणि चविष्ट पदार्थ शोधले जातात. जर तुम्ही रोज तीच साबूदाण्याची खिचडी किंवा फळे खाऊन कंटाळला असाल, तर घरीच काही सोपे स्नॅक्स बनवू शकता. कुरकुरीत बटाटा बाईट्सपासून ते मखाणा आणि चटपटीत उपवासाच्या चाटपर्यंत, हे पदार्थ बनवायला खूप कमी वेळ लागतो. शिवाय हे सर्व पदार्थ घरात सहज उपलब्ध असलेल्या साहित्यापासून बनविता येतात. घरीच बनविता येतील असे नवरात्रीचे ७ झटपट स्नॅक्स खालीलप्रमाणे आहेत.

१) साबूदाणा टिक्की

साबूदाणा टिक्की हा उपवासाचा एक लोकप्रिय स्नॅक आहे. ही टिक्की बाहेरून कुरकुरीत आणि आतून मऊ असते. भिजवलेल्या साबूदाण्यात उकडलेला आणि कुस्करलेला बटाटा, भाजलेले शेंगदाणे, हिरवी मिरची, कोथिंबीर आणि शेंदेलोण (रॉक सॉल्ट) मिसळा. या मिश्रणाचे छोटे गोळे करून टिक्कीचा आकार द्या. त्यानंतर तुपात किंवा तेलात सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत शॅलो-फ्राय करा. उपवासाच्या हिरव्या चटणीसोबत किंवा साध्या दह्यासोबत ही गरमागरम टिक्की सर्व्ह करा.

२) मखाणा चाट

मखाणा चाट हा एक हलका स्नॅक असून तो अवघ्या काही मिनिटांत तयार होतो. एका पॅनमध्ये मखाणा कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या. त्यात उकडलेल्या बटाट्याचे तुकडे, काकडी, डाळिंबाचे दाणे आणि भाजलेले शेंगदाणे घाला. चवीसाठी शेंदेलोण, भाजलेल्या जिऱ्याची पूड आणि लिंबाचा रस टाका. कुरकुरीत मखाणा, ताज्या भाज्या आणि आंबट लिंबू यामुळे उपवासात हा एक उत्तम स्नॅक ठरतो.

३) आलू चाट

झटपट आणि पोटभरीच्या स्नॅकसाठी उपवासाचा आलू चाट नक्की ट्राय करा. उकडलेल्या बटाट्याचे तुकडे करा आणि तुपात सोनेरी रंगाचे होईपर्यंत हलके भाजून घ्या. त्यात शेंदेलोण, भाजलेल्या जिऱ्याची पूड, लिंबाचा रस आणि बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. आंबट-गोड चवीसाठी तुम्ही यात डाळिंबाचे दाणेही घालू शकता. हा पदार्थ बनवायला अतिशय सोपा असून यासाठी खूप कमी वेळ लागतो.

४) रताळ्याचा चाट

रताळे हा उपवासासाठी एक उत्तम पर्याय असून त्यामुळे पोटही भरलेले राहते. रताळे उकडून किंवा भाजून त्याचे छोटे तुकडे करा. त्यात लिंबाचा रस, शेंदेलोण, भाजलेल्या जिऱ्याची पूड आणि कोथिंबीर घाला. अधिक कुरकुरीतपणासाठी वरून थोडे भाजलेले शेंगदाणे भुरभुरा. हा स्नॅक तुम्ही आधीच तयार करून ठेवू शकता आणि खाण्यापूर्वी सर्व्ह **करू शकता.**

५) शिंगाड्याच्या पिठाचे पॅनकेक

जर तुम्हाला काहीतरी वेगळे खायचे असेल, तर शिंगाड्याच्या पिठाचे झटपट पॅनकेक बनवा. शिंगाड्याच्या पिठात कुस्करलेला उकडलेला बटाटा, शेंदेलोण, बारीक चिरलेली हिरवी मिरची आणि कोथिंबीर मिसळा. घट्ट पीठ तयार करण्यासाठी त्यात थोडे पाणी घाला. गरम तव्यावर थोडे पीठ टाकून दोन्ही बाजूंनी तुपात सोनेरी रंगाचे होईपर्यंत भाजा. दही किंवा उपवासाच्या चटणीसोबत हे पॅनकेक सर्व्ह करा.

६) क्रिस्पी पोटॅटो बाईट्स

नवरात्रीत सायंकाळच्या भुकेसाठी तुम्ही बटाट्यापासून झटपट स्नॅक बनवू शकता. कुस्करलेल्या उकडलेल्या बटाट्यामध्ये शिंगाड्याचे पीठ, शेंदेलोण, हिरवी मिरची आणि कोथिंबीर मिसळा. या मिश्रणाचे छोटे गोळे किंवा तुकडे करा आणि कुरकुरीत व सोनेरी रंगाचे होईपर्यंत शॅलो-फ्राय करा. दही किंवा घरी बनवलेल्या उपवासाच्या डीपसोबत लगेच सर्व्ह करा.

७) शेंगदाणा आणि मखाणा मिक्स

ज्यांना गॅस न पेटवता झटपट स्नॅक हवा आहे. त्यांच्यासाठी भाजलेले शेंगदाणे आणि मखाणा मिक्स हा एक उत्तम पर्याय आहे. एका पॅनमध्ये थोडे तूप घालून मखाणा आणि शेंगदाणे वेगळे भाजून घ्या. ते एकत्र करा आणि त्यात शेंदेलोण, भाजलेल्या जिऱ्याची पूड आणि उपवासाला चालत असल्यास थोडी काळी मिरी पावडर घाला. हे मिश्रण हवाबंद डब्यात साठवून ठेवा आणि भूक लागेल तेव्हा खा.

नवरात्रीचे स्नॅक्स बनविण्यासाठी टिप्स

नवरात्रीत उपवासाचे नियम प्रत्येक घरात आणि भागात वेगवेगळे असू शकतात. शेंदेलोण, शिंगाड्याचे पीठ, कुट्टूचे पीठ, साबुदाणा, मखाणा, बटाटा आणि रताळे हे पदार्थ उपवासात सर्रास वापरले जातात. पण तुमच्या घरातील प्रथेनुसार तुम्ही यात बदल करू शकता. स्नॅक्स हलके ठेवण्यासाठी शक्यतो डीप-फ्राय करण्याऐवजी रोस्टिंग किंवा शॅलो-फ्राय करण्याला प्राधान्य द्या. उकडलेले बटाटे आणि भाजलेले मखाणे आधीच तयार ठेवल्यास स्नॅक्स बनवण्याचा वेळ वाचतो.

तुम्हाला कुरकुरीत, चटपटीत किंवा हलके पदार्थ आवडत असतील, तर हे सात झटपट स्नॅक्स तुमच्या उपवासाच्या मेनूमध्ये नक्कीच विविधता आणतील. यासाठी तुम्हाला स्वयंपाकघरात तासन्तास घालवण्याची गरज नाही.

केमिकलने पिकवलेली केळी कशी ओळखायची?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

केळ हे प्रत्येकाच्या आहारातील अविभाज्य घटक आहे. मात्र, बाजारातील पिवळीधमक केळी आरोग्यासाठी फायदेशीर असतीलच असे नाही.

सध्या फळे लवकर पिकवण्यासाठी घातक रसायनांचा वापर केला जातो. या पार्श्वभूमीवर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने नैसर्गिकरित्या पिकवलेली केळी कशी ओळखावी हे सांगितले आहे.



नैसर्गिक की रासायनिक? कसे ओळखाल

जर केळीच्या मधला भाग गडद पिवळा असेल, परंतु देठ आणि खालचे टोक हिरवे दिसत असेल, तर समजून जा की ते केमिकल वापरून पिकवले आहे. सहसा अशी फळे कॅल्शियम कार्बाइड वापरून पिकवली जातात, ज्यामुळे ती बाहेरून पिकलेली दिसतात पण आतून कच्ची असू शकतात.

नैसर्गिकरित्या पिकलेल्या केळ्याचे देठ किंवा टोकाचा भाग हलका काळा किंवा तपकिरी पडलेला असतो. याचा अर्थ असा की, फळ झाडावर किंवा नैसर्गिक प्रक्रियेतून पूर्ण पिकलेले असून ते खाण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित आहे.कॅल्शियम कार्बाइडसारख्या रसायनांचा वापर आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकतो. यामुळे पोटात जळजळ होणे, तीव्र वेदना, जुलाब आणि चक्कर येणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

एफएसएसएआयने भारतात फळे पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे. त्याऐवजी सुरक्षित मानल्या जाणाऱ्या 'इथिलीन गॅस'चा मर्यादित वापर करण्यास परवानगी दिली आहे. ज्यामुळे मानवी आरोग्याला कोणतीही इजा होत नाही.

हार्ट अटॅकचा धोका कमी करायचाय?

आजपासूनच लावून घ्या 'या' ५ सवयी; कोणत्याही वयात हृदय राहील निरोगी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



आजकाल कमी वयातही हृदयविकाराच्या घटना समोर येताना दिसतात. त्यामुळे हार्ट अटॅकपासून स्वतःचा बचाव कसा करायचा? हा प्रश्न अनेकांच्या मनात असतो. बदललेली जीवनशैली, चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयी, व्यायामाचा अभाव, वाढते वजन, ताणतणाव आणि धूम्रपान यांसारख्या अनेक घटकांमुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.

आपण दिवसभर बसून काम करतो, बाहेरचे किंवा प्रक्रिया केलेले पदार्थ खातो आणि व्यायामासाठी वेळ देत नाही. याचा परिणाम रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, वजन आणि रक्तवाहिन्यांच्या आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे हृदय निरोगी ठेवण्यासाठी रोजच्या जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करणे गरजेचे आहे.

१) शरीराला रोज हालचाल द्या; व्यायाम टाळू नका

हृदय हा शरीरातील एक स्नायू आहे आणि त्याच्या आरोग्यासाठी नियमित शारीरिक हालचाल महत्त्वाची आहे. रोज चालणे, सायकल चालवणे, पोहणे किंवा आपल्या क्षमतेनुसार व्यायाम करणे फायदेशीर ठरू शकते. दररोज साधारण ३० मिनिटे शारीरिक हालचाल करण्याची सवय लावा. ऑफिसमध्ये सतत बसून काम करत असाल तर मध्येच उठून थोडे चालणेही महत्त्वाचे आहे. नियमित हालचालीमुळे वजन, रक्तदाब आणि हृदय व रक्तवाहिन्यांच्या आरोग्याशी संबंधित अनेक जोखीम घटक नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.

२) ताटात काय वाढता, याकडे लक्ष द्या

हृदय निरोगी ठेवण्यासाठी केवळ व्यायाम पुरेसा नाही; आहारही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रक्रिया केलेले पदार्थ, पॅकेटमधील खाद्यपदार्थ, जंक फूड, अतिरिक्त साखर, जास्त मीठ आणि अतितेलकट पदार्थांचे सेवन करू नका. संतुलित आहार आणि नियमित व्यायामाच्या मदतीने वजन निरोगी पातळीवर ठेवण्याचा प्रयत्न करा.

४) सततचा ताण कमी करा

आजच्या धावपळीच्या जीवनात ताण टाळणे कठीण असले तरी तो सतत वाढत राहू देणे योग्य नाही. दीर्घकाळचा मानसिक ताण झोप, रक्तदाब आणि एकूण आरोग्यावर परिणाम करू शकतो. मन शांत ठेवण्यासाठी रोज काही वेळ योग, ध्यान, श्वसनाचे व्यायाम किंवा आपल्या आवडीच्या आरामदायी उपक्रमांसाठी द्या. पुरेशी झोप आणि कुटुंबीयांसोबत किंवा मित्रांसोबत वेळ घालवणेही तणाव व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरू शकते.

५) सिगारेटला कायमचा निरोप द्या

धूम्रपान हे हृदयासाठी अत्यंत महत्त्वाचे टाळता येण्याजोगे जोखीम घटक आहे. सिगारेटमधील रसायनांचा रक्तवाहिन्या आणि हृदयाच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे तुम्ही धूम्रपान करत असाल तर ते सोडणे हा हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा निर्णय ठरू शकतो. तसेच अल्कोहोलचे सेवन करत असल्यास ते मर्यादित ठेवणे किंवा टाळणे फायदेशीर ठरू शकते. धूम्रपान आणि मद्यपानाच्या सवयींबाबत गरज असल्यास डॉक्टर किंवा तज्ज्ञांची मदत घ्या.

हृदयासाठी आजपासूनच करा 'या' ५ गोष्टी

निरोगी हृदयासाठी एखादा चमत्कारी उपाय शोधण्यापेक्षा रोजच्या छोट्या सवयी बदलणे अधिक महत्त्वाचे आहे. नियमित शारीरिक हालचाल, संतुलित आहार, वजन नियंत्रण, तणावाचे व्यवस्थापन आणि धूम्रपानापासून दूर राहणे या सवयी हृदयविकाराच्या जोखमीवर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकतात. मात्र, हार्ट अटॅकचा धोका पूर्णपणे टाळता येतो असे नाही. कुटुंबातील हृदयविकाराचा इतिहास, मधुमेह, उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि इतर वैद्यकीय कारणेही महत्त्वाची असतात. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी करणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक चाचण्या करून घेणे तितकेच गरजेचे आहे.



नवरात्रीत घरात अखंड दिवा का लावावा?

जाणून घ्या योग्य दिशा, नियम आणि पूजा पद्धत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आदिमाया आदिशक्ती देवीचा नवरात्री उत्सव अगदी उद्यावर आला आहे. वर्षातील सर्वांत महत्त्वाचे नऊ दिवस म्हणून शारदीय नवरात्रीची ओळख आहे. नवरात्रीत घटस्थापना केली जाते. त्याचप्रमाणे या ९ दिवसांत घरात अखंड दिवा लावण्याचीही प्रथा आहे.

अखंड दिवा हा जे लोक घट बसवितात ते देखील लावतात किंवा ज्यांच्याकडे घट नसतात ते देखील अखंड दिवा लावतात. अखंड दिवा म्हणजे, नऊ दिवस देवीजवळील दिवा शांत होऊ द्यायचा नसतो. अखंड दिवा प्रज्वलित करण्याचे विशेष महत्त्व आहे. याशिवाय पूजेची सुरुवात अपूर्ण मानली जाते. कलश स्थापनेनंतर पहिल्या दिवशी अखंड दिवा प्रज्वलित करावा. नवरात्रीच्या दिवसांमध्ये पूर्ण ९ दिवसांपर्यंत अखंड ज्योत लावली जाते. कारण अखंड ज्योतीला देवीचे स्वरूप मानले जाते आणि त्याची पूजा केली जाते.

नवरात्रात अखंड दिवा का लावला जातो?

आपल्या हिंदू धर्मात नवरात्राला खूप महत्त्व आहे. आपण वर्षातून २ वेळा देवीची उपासना करतो. नवरात्रीत देवी आईला प्रसन्न करण्यासाठी भाविक घट स्थापना, अखंड दिवा, जागरण इत्यादी करतात. नवरात्रीच्या ९ दिवसात आपण घरात घट स्थापना आणि अखंड दिवा लावतो. या अखंड दिव्याला न विझू देता तेवण्याचा नियम आहे. हा अखंड दिवा लावल्यावर आपण ह्याला एकटे सोडू शकत नाही आणि त्याला विझू द्यायचे नाही. जर का हा दिवा विझला तर हे वाईट मानले आहे.

नवरात्रातील ९ दिवस दिवा तेवत ठेवणे याला अखंड दिवा म्हणतात. नवरात्रीत दिवा तेवत ठेवल्यानं घरात सौख्य आणि शांतता बनून राहते आणि सर्व कार्य पूर्ण सिद्ध होतात. म्हणून



नवरात्रीच्या पहिल्या दिवशीच संकल्प घेऊन अखंड दिवा लावावा आणि त्याचे नियमानं संरक्षण करावं.

अखंड दिवा लावण्याची पद्धत

नवरात्रात अखंड दिवा लावण्याचे काही नियम आहेत, त्यामुळे आपल्याला इच्छित फळ मिळू शकतात. सहसा लोकं पितळ्याचा दिवा अखंड दिवा म्हणून तेवतात. जर आपल्याकडे पितळ्याचा दिवा नाही तर आपण मातीचा दिवा देखील लावू शकता. मातीच्या दिवा अखंड दिवा म्हणून तेवण्यापूर्वी दिव्याला संपूर्ण एक दिवस पाण्यात भिजवून ठेवा आणि त्याला पाण्यातून काढून स्वच्छ कपड्याने पुसून वाळवून घ्या. अखंड दिवा लावण्यापूर्वी मनात संकल्प करावा आणि आपल्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात अशी प्रार्थना देवीआईजवळ करावी.

अखंड दिवा लावण्याचे नियम

❊ अखंड दिवा कधीही जमिनीवर ठेवू नये. चौरंग किंवा पाटावर ठेवावा. जर तुम्ही देवीसमोर दिवा लावत असाल तर त्याखाली आसन ठेवा किंवा अष्टदल कमळ ठेवा.

❊ अखंड दिव्याची वात रक्षासूत्र म्हणजे कलावापासून सून बनवलेली असते. सव्वा हाताचा मापाचं हे रक्षासूत्र असते. पूजेत वापरला जाणारा कच्चा कापूस घेऊन वात वळतात आणि ती वात मध्यभागी ठेवतात.

❊ अखंड दिवा लावण्यासाठी तुपाचा, तीळाचं तेल किंवा मोहरीचं तेल याचा वापर करावा.

❊ अखंड दिवा देवी आईच्या उजव्या बाजूस ठेवावा, पण दिवा तेलाचा असेल तर डाव्या बाजूस ठेवावा.

❊ ईशान्य कोण म्हणजे उत्तर पूर्व दिशा ह्याला देवी देवांचे स्थान मानतात. म्हणून अखंड दिवा पूर्व- दक्षिण दिशा म्हणजे आग्नेय कोणात ठेवणे शुभ असते. लक्षात ठेवा की पूजेच्या वेळी दिव्याचे तोंड पूर्वी कडे किंवा उत्तरेकडे असावे.

❊ अखंड दिवा तेवण्यापूर्वी हात जोडून श्री गणेश, देवी दुर्गा आणि भगवान शंकराची पूजा करावी. दिवा लावताना मनातल्या मनात आपल्या इच्छेबद्दल विचार करा आणि देवी आईला विनवणी करा की पूजेच्या सांगतासह माझ्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात.

❊ ९ दिवस झाल्यावर अखंड दिवा फुंकर मारून विझवू नये, तो आपोआप शांत होऊ द्या.

अखंड दिवा लावताना हा मंत्र म्हणावा

ॐ जयंती मंगला काली भद्रकाली कृपालिनी दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा स्वधा नमोऽस्तुते ॥

नवरात्रीचे ९ दिवस 'या'राशींसाठी भाग्याचे

लक्ष्मीच्या पावलांनी दारी येणार श्रीमंती, मागाल ती इच्छा होणार पूर्ण

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शारदीय नवरात्रीच्या प्रतिपदा तिथीला सूर्योदयाच्या वेळी हस्त नक्षत्र आणि शुक्ल योग असेल. तसेच, गुरू आणि चंद्र यांच्या संयोगातून निर्माण होणारा 'गजकेसरी योग' देखील प्रभावी असेल. ग्रहांच्या या स्थितीमुळे हा काळ पाच राशींसाठी शुभ ठरेल.



मेष :

या राशीच्या व्यक्तींना शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी आर्थिक लाभ होऊ शकतो. तुमच्या कष्टाचे फळ तुम्हाला मिळेल. नोकरीच्या शोधात असलेल्यांना यश मिळू शकते. तसेच, मेष राशीच्या लोकांना त्यांचे पूर्वी अडकलेले किंवा येणे बाकी असलेले पैसे परत मिळू शकतात.

कर्क :

शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी, शुभ ग्रहस्थितीमुळे कर्क राशीच्या व्यक्तींना आर्थिक लाभहोऊ शकतो. तुम्हाला कामाच्या संदर्भात चांगली बातमी मिळू शकते आणि दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या कामात यश प्राप्त होऊ शकते. नोकरीच्या शोधात असलेल्यांना नवीन नोकरी मिळू शकते.

सिंह :

या राशीच्या व्यक्तींना शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी लाभ होऊ शकतो. तुम्हाला तुमच्या कामात यश मिळेल. आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्यांना आर्थिक लाभ होऊ शकतो.

तूळ :

या राशीच्या व्यक्तींना करिअर आणि व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. तुमच्या आयुष्यातील अडथळे दूर होतील. कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे तुम्हाला पुढे जाण्यास मदत होईल. नोकरी बदलण्यासाठी हा अनुकूल काळ आहे.

मकर :

या राशीच्या व्यक्तींना प्रगती दिसून येऊ शकते. तुमच्या कामात यशाची चिन्हे आहेत आणि तुम्हाला व्यावसायिक जीवनात पुढे जाण्याच्या संधी मिळतील. अडकलेले पैसे परत मिळू शकतात आणि तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

'ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे' महामंत्र का अर्थ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

इस मन्त्र को नवार्ण मंत्र भी कहा जाता है जो देवी भक्तों में सबसे प्रशस्त मंत्र माना गया है। इस मन्त्र के जाप से महासरस्वती, महाकाली तथा महालक्ष्मी माता की कृपा तथा आशीर्वाद प्राप्त होता है।

समस्त जगत परब्रह्म की शक्ति है तथा वस्तुतः ब्रह्म की सत् शक्ति के आधार पर भौतिक सृष्टि की प्रतीति हो रही है, चित्त में चेतन जगत् की प्रतीति, आनंद से जगत् में प्रियता की प्रतीति है। इस प्रकार जगत् सत, चित, आनंद रूप ही है, भ्रम से अन्य प्रतीत होता है।

ॐ : उस परब्रह्म का सूचक है जिससे यह समस्त जगत व्याप्त हो रहा है।

ऐं : यह वाणी, ऐश्वर्य, बुद्धि तथा ज्ञान प्रदात्री माता सरस्वती का बीज मन्त्र है। इस बीज मन्त्र का जापक विद्वान हो जाता है। यह वाक् बीज है, वाणी का देवता अग्नि है, सूर्य भी तेज रूप अग्नि ही है, सूर्य से ही दृष्टि मिलती है; दृष्टि सत्य की पीठ है, यही सत्य परब्रह्म है।

ह्रीं : यह ऐश्वर्य, धन ,माया प्रदान करने वाली माता महालक्ष्मी का बीज मंत्र है। इसका उदय आकाश से है । पीठ विशुद्ध में, आयतन सहस्रार में, किन्तु श्रीं का उदय आकाश में होने पर भी आयतन आज्ञाचक्र में है।

क्लीं : यह शत्रुनाशक, दुर्गति नाशिनी महाकाली का बीज मन्त्र है। इस बीज में पृथ्वी तत्व की प्रधानता सहित वायु तत्व है जोकि प्राणों का आधार है।

चामुण्डायै : प्रवर्ति का अर्थ चण्ड तथा निर्वृति का अर्थ मुण्ड है। यह दोनों भाई काम और क्रोध के रूप भी माने गए हैं। इनकी संहारक शक्ति का नाम ही चामुण्डा है। जो स्वयं प्रकाशमान है।

विच्चे : विच्चे का अर्थ समर्पण या नमस्कार है। अतः सम्पूर्ण मन्त्र का अर्थ है। संसार के आधार परब्रह्म, ज्ञान की अधिष्ठात्री देवी सरस्वती, सम्पूर्ण संकल्पों की अधिष्ठात्री देवी महामक्ष्मी, सम्पूर्ण कर्मों की स्वामिनी महाकाली तथा काम और क्रोध का विनाश करनी वाली सच्चिदानंद अभिन्नरूपा चामुण्डा को नमस्कार है, पूर्ण समर्पण है। तीनो बीज परमात्मा के वाचक हैं। अभी आकृतियां सत्व तत्व में काली रूप, सभी प्रतीतियां चित्त तत्व में महालक्ष्मी रूप तथा सभी प्रीतियाँ आनंद तत्व में महासरस्वती रूप में ही विवर्त हैं। सत, चित्त आनंद स्वरुप माता आप तथा आपके परिवार पर सदैव कृपादृष्टि बनाये रखे।

॥ जय माता दी॥
चामुंडा जय माता सरस्वती
जय माता काली

श्री दुर्गा सप्तशती ग्रंथाची फलश्रुती

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शारदीय नवरात्रात या ग्रंथाचे पठण अवश्य करावे. त्याचे विशेष फल आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमी याला शारदीय नवरात्र असे म्हणतात. अर्थात चैत्र, आषाढ महिन्यातील पहिले नऊ दिवस सुद्धा नवरात्राचे म्हणून समजले जात असले तरी शारदीय नवरात्राला विशेष महत्त्व आहे. दुर्गामाता नवविधा आहे. देवीने नऊ दिवस युद्ध करून महिषासुराचा वध केला म्हणून देवीच्या उपासनेत नऊ दिवस-नऊ रात्रीला विशेष महत्त्व आहे. देवीने स्वतः सांगितले आहे, की जो शारदीय नवरात्रात माझी यथासांग पूजाअर्चा करून परम श्रद्धेने व भक्तीने माझ्या या देवीमहात्म्याचे



पठण, श्रवण करतो त्याच्यावर माझी पूर्ण कृपा होते. माझ्या कृपाप्रसादाने तो सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्त होतो व त्याला धन-धान्य, पुत्र इत्यादींची प्राप्ती होते. ज्याची जी इच्छा असेल ती मी पुरवते. देवीने दिलेले हे आश्वासन पूर्ण लक्षात ठेवावे. त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवावी व शारदीय नवरात्रात घटस्थापनादी करून दररोज पूजा करून या देवी महात्म्याचे समग्र पठण करावे. पठणानंतर देवीची आरती करावी. श्रद्धा तसे फळ हा नियम लक्षात ठेवावा. सातत्याने व परम श्रद्धेने केलेली अल्प उपासना ही फार मोठे फळ देते.

। दुर्गे देवी नमोस्तुते।

कुलदेवतेला दोष देण्यापूर्वी आपला कुळाचार घ्या समजून!

कुलदेवता, कुळाचार आणि आपल्या पूर्वजांनी जपलेली परंपरा.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कुलदेवता म्हटले, की आपल्या मनात सर्वप्रथम आपल्या कुळाची रक्षण करणारी, आपल्या पूर्वजांनी श्रद्धेने मानलेली आणि पिढ्यान्पिढ्या पूजली गेलेली देवशक्ती उभी राहते. कुलदेवता म्हणजे कुळाची मालकीन आणि कुळाचे रक्षण करणारी शक्ती, अशी आपल्या पारंपरिक श्रद्धेतील तिची ओळख आहे. त्यामुळे कुलदेवतेशी असलेले नाते हे केवळ एखाद्या देवतेची पूजा करण्यापुरते मर्यादित नसते, तर त्यामागे आपल्या अनेक पिढ्यांचा इतिहास, श्रद्धा, परंपरा आणि पूर्वजांनी निर्माण करून ठेवलेली धार्मिक व्यवस्था जोडलेली असते. मात्र आजच्या काळात एखाद्या व्यक्तीच्या जीवनात अडचणी निर्माण झाल्या, संकटे आली किंवा अपेक्षित गोष्टी घडल्या नाहीत की त्याचा थेट संबंध कुलदेवतेशी जोडला जातो. 'आम्ही कुलदेवतेची सेवा करतो, पूजा करतो, तरी कुलदेवता आम्हाला साथ देत नाही,' अशी तक्रार केली जाते आणि नकळत कुलदेवतेलाच दोष दिला जातो. परंतु या विषयाकडे इतक्या सरळ पद्धतीने पाहणे योग्य नाही.

परंपरागत मांडणीनुसार कुलदेवतेचा प्रभाव हा आपल्या संपूर्ण कुळाच्या धार्मिक व्यवस्थेतील एक भाग मानला जातो. कुलदेवतेचा हा प्रभाव साधारण ३० टक्के मानला जातो. याचा अर्थ असा, की आपल्या आयुष्यातील किंवा कुळातील प्रत्येक गोष्ट केवळ कुलदेवतेच्या कृपा-अकृपेवर अवलंबून नसते. आपल्या कुळाचा इतिहास, पूर्वजांनी निर्माण केलेले रीतिरिवाज, त्यांनी जोडून घेतलेल्या विविध देवशक्ती, मूळ गावातील देवता, स्थलांतरानंतरच्या गावातील ग्रामदेवता, स्थानिक स्थानशक्ती आणि त्या शक्तींना दिलेले मानपान या सर्वांचा एकत्रित विचार करावा लागतो. त्यामुळे केवळ कुलदेवतेची पूजा करूनही काही अडचणी येत असतील, तर लगेच 'कुलदेवता साथ देत नाही' असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. उलट त्या परिस्थितीमागे आपल्या कुळाची परंपरा आणि पूर्वजांनी निर्माण केलेला कुळाचार काय आहे, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते.

काही पारंपरिक श्रद्धांमध्ये देवतेच्या बंधनाची संकल्पनाही आढळते. भावकीतील किंवा जवळच्या व्यक्तींनी एखाद्या देवशक्तीला बंधनात ठेवले असेल, तर त्या देवतेची कृपाछाया, कृपादृष्टी किंवा तिचा आशीर्वाद संबंधित व्यक्तीपर्यंत अपेक्षित स्वरूपात पोहोचत नाही, अशी पारंपरिक धारणा सांगितली जाते. त्यामुळे व्यक्तीला काही प्रकारचा त्रास जाणवू शकतो, असे मानले जाते. मात्र या संकल्पनेचा अर्थ असा अजिबात घेऊ नये की प्रत्येक अडचणीमागे कोणीतरी देवतेला बांधून ठेवलेलेच आहे. अशा गोष्टी सांगताना किंवा ऐकताना विवेक ठेवणे गरजेचे आहे. कारण आपल्या कुळाच्या वास्तविक परंपरेचा, पूर्वजांच्या इतिहासाचा आणि पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या विधींचा संदर्भ समजून घेतल्याशिवाय कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचणे योग्य नाही.

या संपूर्ण विषयाचा केंद्रबिंदू म्हणजे कुळाचार. आजकाल 'कुळाचार' हा शब्द इतक्या सहजपणे वापरला जातो, की त्याचा मूळ अर्थच अनेकदा बाजूला पडतो. एखाद्या देवतेची एखादी पूजा पाहिली, एखादी विशिष्ट वस्तू पाहिली किंवा एखाद्या देवतेशी संबंधित एखादा विधी ऐकला की त्याला लगेच कुळाचार असे म्हटले जाते. प्रत्यक्षात कुळाचार हा इतका मर्यादित विषय नाही. आपल्या पूर्वजांनी आपल्या कुळासाठी निर्माण केलेले, स्वीकारलेले आणि पिढ्यान्पिढ्या पुढे चालवत आणलेले विधी, रीतिरिवाज, मानपान आणि देवतांशी संबंधित आचार यांची संपूर्ण परंपरा म्हणजे कुळाचार, असे त्याकडे पाहता येते. म्हणून कुळाचार समजून घेण्यासाठी सर्वप्रथम आपल्या पूर्वजांचा इतिहास



समजून घेणे आवश्यक आहे.

पूर्वीच्या काळात अनेक कुटुंबांनी एका गावातून दुसऱ्या गावात स्थलांतर केले. स्थलांतर झाले म्हणजे पूर्वजांनी आपली संपूर्ण धार्मिक परंपरा मागे सोडली असे होत नाही. ते ज्या मूळ गावातून दुसऱ्या ठिकाणी गेले, त्या गावातील देवता किंवा शक्तींशी त्यांचा जुना संबंध असू शकतो. स्थलांतर करताना काही परंपरा, श्रद्धा किंवा देवशक्तींशी असलेले संबंध त्यांनी नवीन ठिकाणीही कायम ठेवले असतील. त्याच वेळी नवीन गावात पोहोचल्यानंतर तेथील ग्रामदेवतेशी संबंध जोडला गेला असेल. त्या परिसरातील स्थानिक शक्तीला मान दिला असेल. एखाद्या देवतेसमोर वचन घेतले असेल किंवा एखाद्या विशिष्ट प्रसंगी विशिष्ट विधी करण्याची पद्धत सुरू केली असेल. अशा प्रकारे पूर्वजांच्या जुन्या परंपरा आणि नवीन ठिकाणी निर्माण झालेले धार्मिक संबंध हळूहळू एकत्र आले आणि पुढील पिढ्यांसाठी एक स्वतंत्र कुळपरंपरा तयार झाली.

यामुळे कुळाचारामध्ये केवळ कुलदेवतेचा समावेश होत नाही. आपल्या पूर्वजांनी स्थलांतर करताना जोडून घेतलेल्या शक्ती, ज्या मूळ गावातून ते आले त्या गावातील ग्रामदेवतेशी असलेला संबंध, नवीन गावात आल्यानंतर त्या ठिकाणच्या ग्रामदेवतेला दिलेला मान, त्या परिसरातील स्थानशक्तीशी जोडलेली परंपरा, त्या शक्तींना दिलेले वचन, त्यांच्यासाठी केलेले मानपान आणि पूर्वजांनी निश्चित करून दिलेले विधी-रीतिरिवाजया सर्वांचा कुळाचारामध्ये विचार होतो. म्हणून कुळाचार हा एका देवतेपुरता मर्यादित नसतो. तो आपल्या पूर्वजांनी अनेक काळात, अनेक ठिकाणी आणि विविध परिस्थितींमध्ये निर्माण केलेल्या धार्मिक संबंधांचा एकत्रित वारसा असतो.

विशेषतः स्थलांतराचा इतिहास या विषयात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. एखादे कुळ मूळ गाव सोडून दुसऱ्या गावात गेले असेल, तर त्या कुळाच्या धार्मिक परंपरेमध्ये मूळ गावातील देवतेचा प्रभाव आणि नवीन गावातील ग्रामदेवतेचा मान, हे दोन्ही वेगवेगळ्या स्वरूपात दिसू शकतात. त्यासोबतच नवीन ठिकाणच्या स्थानशक्तीला दिलेला मान, पूर्वजांनी केलेली वचने आणि त्यानुसार पाळलेले विधी यांचाही समावेश होऊ शकतो. त्यामुळे आज एखाद्या कुटुंबाने फक्त 'आमची कुलदेवता अमुक आहे' एवढे सांगितले, तरी त्यावरून त्या कुटुंबाचा संपूर्ण कुळाचार समजला असे म्हणता येणार नाही. कुलदेवतेचे नाव ही सुरूवात असू शकते; पण कुळाचार समजून घेण्यासाठी त्यापुढचा संपूर्ण इतिहास समजून घ्यावा लागतो

आजच्या काळात मात्र याच ठिकाणी सर्वांत मोठा गैरसमज निर्माण होत आहे. सोशल मीडिया, पॉडकास्ट आणि व्हिडिओंच्या माध्यमातून कुळाचाराविषयी अनेक प्रकारची माहिती दिली जाते. काही जण एखाद्या विशिष्ट देवतेची किंवा प्रदेशाची परंपरा सांगतात आणि तीच परंपरा सर्व कुळांना लागू होईल अशा पद्धतीने मांडली जाते. विशेषतः तुळजाभवानीचा कुळाचार, ज्योतिबाचा कुळाचार किंवा इतर प्रसिद्ध देवतांच्या परंपरांवर चर्चा मोठ्या प्रमाणात केली जाते. त्या परंपरांना त्यांचे स्वतःचे महत्त्व आहे; परंतु एका देवतेची किंवा एका कुळाची परंपरा म्हणजे प्रत्येक कुळाचा कुळाचार, असे समजणे योग्य नाही. प्रत्येक कुळाचा पूर्वजांचा इतिहास वेगळा आहे, प्रत्येकाचे स्थलांतर वेगळे आहे, त्यांनी जोडलेल्या देवशक्ती वेगळ्या असू शकतात आणि ग्रामदेवता व स्थानशक्तीशी असलेले संबंधही वेगळे असू शकतात. त्यामुळे प्रत्येकाचा कुळाचार एकच असू शकत नाही. याच कारणामुळे 'आपली भवानी कोण?' किंवा 'आपला कुळाचार कोणता?' या प्रश्नांची उत्तरेही केवळ ऐकीव माहितीवरून ठरवू नयेत. काही विशिष्ट परंपरांमध्ये कवड्यांची माळ, गनमाळ, परडी यांसारख्या वस्तूंना धार्मिक महत्त्व असू शकते. परंतु एखाद्या व्हिडिओमध्ये किंवा पॉडकास्टमध्ये या वस्तूंचा उल्लेख झाला म्हणून त्या प्रत्येक कुळाने आपल्या घरात स्वीकाराव्यात, असा त्याचा अर्थ होत नाही. एखाद्या परंपरेतील एखादी वस्तू ही त्या विशिष्ट परंपरेचे प्रतीक असू शकते; पण ती आपल्या कुळाचाराचा भाग आहे की नाही, हे आपल्या पूर्वजांच्या परंपरेवर अवलंबून असते. म्हणून अशा गोष्टींमध्ये सरळ हात घालण्यापूर्वी त्यामागचा इतिहास आणि आपल्या कुळाशी असलेला संबंध समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)